येईल. वरील अर्जावर महामंडळ योग्य तो निर्णय घेईल.

वरील तत्त्वप्रणाली नुसार नोकरी देण्याबाबत दिनांक १.१.१९९० पासून प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे विचारात घेतली जातील.

अनुकंपा तत्वावर रा.प.कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास नोकरी देण्याबाबतची जी प्रकरणे १.१.१९९० नंतर काही कारणास्तव नामंजूर करण्यात आली असतील अशी सर्व प्रकरणे सुध्दा वरील तत्वप्रणाली नुसार तपासून तत्काळ लवकर महामंडळास सादर करावी.

अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबाबतची सर्व विभागवार प्रकरणांची माहिती प्रादेशिक कार्यालयांनी / मध्यवर्ती कार्यशाळा यांनी दर सहा महिन्यांनी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयास सादर करावी.

अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यास पात्र ठरविण्यात आलेल्या अवलंबित उमेदवारांकडून नेमणूक देण्यापूर्वी विहित केलेला रा.प. अर्ज भरुन घेणे आवश्यक राहील.

वरील सर्व बाबींची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे तातडीने अंमलबजावणी करावी.

वरील परिपत्रक मिळाल्याची पोच द्यावी.

उप महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

एसबी/१६२२४.